# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – १४ एप्रिल २०१५

# मुंबई विद्यापीठात साकारणार डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय अभ्यास केंद्र

मुंबई- मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात लवकरच डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय अभ्यास केंद्र सुरु केले जाणार आहे.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२४ व्या जयंती सोहळ्यात आज मुंबई विद्यापीठातर्फे हे अभ्यासकेंद्र लवकरच सुरु केले जाणार असल्याचे जाहिर करण्यात आले.त्यासाठी विद्यापीठाने या अर्थसंकल्पात तशी तरतूदही केली आहे.

भारतीय समाजातल्या रंजल्या-गांजल्या आणि त्यांच्या मुलभूत हक्कांपासून वंचित असलेल्या लोकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच या समाजाचे नैतिक अधिष्ठान तयार करुन शैक्षणिक,सामाजिक,राजकिय आणि सांस्कृतिक सक्षमीकरणासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. त्यासाठी त्यांनी विपूल ग्रंथसंपदा तयार केली.अनेक संशोधनपर ग्रंथ त्यांनी लिहले.अश्पृश्यांच्या उध्दारासाठी त्यांनी आपल्या लेखणीतून आवाज दिला.समृध्द राष्ट्राच्या विकासासाठी आणि समाजाच्या प्रगतीसाठी त्यांनी अनेक लेखांतून वैचारिक मांडणी केली.तर भारतासारख्या मोठ्या विषमतावादी देशात समता,स्वातंत्र,बंधुता यांची सांगड कशी घातली जाणार यावरही त्यांनी विपूल लेखन केले.त्यांच्या लेखनातून समृध्द आणि निरोगी समाजाची संकल्पना साकारली गेली.डॉ.बाबासाहेबांची विपूल ग्रंथसंपदा आज उपलब्ध आहे.त्यांच्या या लिखानातून समकालीन समाजाचे प्रतिबिंब सहजरित्या जाणवत आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे विचार ,त्यांची समता,स्वातंत्र आणि बंधुत्वा या त्रयीवर आधारीत समाजरचनेचा सखोल अभ्यास करण्यासाठी मुंबई विद्यापीठाने एक महत्वाचे पाऊल उचलले असून त्यांच्या नावे आंतरराष्ट्रीय दर्जाचे अभ्यास केंद्र मुंबई विद्यापीठात सुरु केले जाणार आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्वज्ञान ,विचार यांचे जतन करुन समताधिष्ठित समाजरचनेचा पाया उभारण्यासाठी हे अभ्यासकेंद्र तयार करण्यात येत आहे.

ध्येय आणि उद्दीष्ट्ये –

१) संशोधनातून ज्ञानाच्या कक्षा विस्तारणे

२) जातीभेदाचे समुळ निवारण करणे,जाती,लिंग भेद,सामाजिक विषमता,धर्म,अल्पसंख्याक यावर संशोधनपर अभ्यास

३) मोठ्या स्तरावर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे प्रचार व प्रसार करणे

४) कार्यक्रमांची आखणी करणे

५) आंतरराष्ट्रीय विकासाच्या दृष्टिकोनातून विकासात्मक ज्ञानसंपदा तयार करणे

६) संशोधन आणि संशोधकांसाठी मोठे व्यासपीठ तयार करणे

७) समकालीन विषयांवर चर्चासत्रे,कार्यशाळा,परिषदांचे आयोजन करणे

८) एम.फील आणि पीएचडी प्रोग्राम राबविणे

९) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा मोठ्या प्रमाणात प्रचार व प्रसार व्हावा यासाठी अत्याधुनिक पायाभूत सुविधा तयार करुन अधिकाअधिक संशोधनवृत्तीला चालना मिळावी यासाठी अद्ययावत व सुसज्ज ग्रंथालय,व साहित्य तयार करणे जेणेकरुन बाहेरील विद्यार्थी व संशोधकांना याचा लाभ घेता येईल.

१०) एक संदर्भ केंद्र म्हणूनही या अभ्यासकेंद्राची ओळख व्हावी

**शिक्षण आणि संशोधनाची क्षेत्रे-**

१) जात,जातीव्यवस्था आणि सामाजिक सलोखा

२) सामाजिक धोरण आणि राजकिय व्यवस्था

३) सामाजिक न्याय केंद्र

४) जेंडर स्टडीज

५) धर्म आणि अल्पसंख्याक अभ्यास केंद्र

६) डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार आणि तत्वज्ञान-पदव्युत्तर अभ्यासक्रम

**सोयीसुविधा-**

सुसज्ज आंतरराष्ट्रीय दर्जाची इमारत ज्यामध्ये दोन सेमिनार हॉल,कान्फरेन्स रुम,ऑडिटोरेएम रुम

२) १०० अभ्यासकांचे ग्रंथालय

३) संगणक रुम

४) बैठक रुम

५) चार वर्गखोल्या

६) कार्यालय

७) अतिथीगृह

८) फॅकल्टी रुम

अशा अद्ययावत सोयीसुविधायुक्त हे अभ्यासकेंद्र लवकरच विद्यानगरी परिसरात उभारले जाणार आहे.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)